हातपंप मदतनीस वर्ग-४ या संवर्गातील
कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती
योजनेचा १२/२४ वर्षानंतर पहिला व दुसरा लाभ
मंजुर करणेबाबत

जिल्हा परिषद अहिल्यानगर
यांत्रिकी उपविभाग,
ग्रामिण पाणी पुरवठा विभाग
आदेश क्र.उप.अभि.(यां.)/आस्था-१/ १४/२०२६
अहिल्यानगर दिनांक स्वाक्षरी खाली नमूद प्रमाणे

संदर्भ -१.वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन/१९९९ प्र.क्र.-२/९९ सेवा-३ दि.२०/०७/२००१
२.वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा-३ दि.०१ एप्रिल २०१०
३.वित्त विभाग शासन निर्णय क्र.वेतन ११०९/प्र.क्र.४१/सेवा-३ दि.०५ जुलै २०१०
४.वित्त विभाग शासन निर्णय क्र.अप्रयो/प्र.क्र.२१/सेवा-३ दि.०६ सप्टेंबर २०१४
५.गठीत निवड समितीचे मंजूर इतिवृत्त दि.२१/०७/२०२५.

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत रु.८०००- १३५०० व त्याहुन कमी वेतनश्रेणी वेतन घेणा-या कर्मचा-यांना लागू करण्यात आलेली आहे.संदर्भ क्र.२ अन्वये ६ व्या वेतन आयोगामध्ये वेतनबॅन्ड पी.बी.३ रु.१५६००-३९१०० ग्रेड वेतन रु.५४०० पर्यंत वेतन घेणा-या कर्मचा-यांना सदर योजना लागू करण्यात आलेली आहे.सबब जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत असणा-या हातपंप मदतनीस यांना सदर योजना लागू करण्यात आलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णय व त्यामधील सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या अटी व शर्ती याबाबत व सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या गठीत समितीने मान्य केलेल्या प्रस्तावाचा विचार करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहिल्यानगर यांत्रिकी उपविभागाच्या अंतर्गत कार्यरत असणा-या खालील नमूद केलेल्या हातपंप मदतनीस यांना त्यांचे सध्याचे एकाच पदावरील १२ वर्षाचे नियमित सेवेनंतर हातपंप मदतनीस हे एकाही पद असल्याने वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड वेतन १६०० (१३००+३००) व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ वेतनश्रेणी ४४४०-७४४० ग्रेड वेतन २००० (१६०० + ४००) त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्र.५ व ६ मध्ये नमूद केलेल्या दिनांकास खालील अटी व शर्तीस अधिन राहून लागू करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव व पदनाम | कार्यालयाचे नांव | प्रथम नेमणुक दिनांक | आश्वासित प्रगती योजनेचा १२ वर्षाचा लाभ मंजुर करणेचा दिनांक | आश्वासित प्रगती योजनेचा २४ वर्षाचा लाभ मंजुर करणेचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | कै.श्री.रहाणे बाजीराव गंगाधर,हातपंप मदतनीस | पंचायत समिती संगमनेर | ०८/०४/१९९० | ०८/०४/२००२ | ०८/०४/२०१४ | एकाकी पद |

**<u>अटी व शर्ती</u>**

१. या योजनेखाली पात्र कर्मचा-यांना सेवेत दोन किंवा त्याहून अधिक वेळा पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.
२. या योनजेचा लाभ संपुर्ण सेवेमध्ये फक्त एक वेळेस घेता येईल
३. नियमित पदोन्नती नाकारलेल्या तसेच नियमित पदोन्नतीस पात्र ठरलेल्या कर्मचा-यांना या योजनेचा लाभ देय ठरणार नाही.
तसेच या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाल्यानंतर नियमित पदोन्नती नाकारलेल्या किंवा नियमित पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचा-यांना देण्यात आलेला लाभ काढून घेण्यात येईल मात्र दिलेल्या लाभाची वसुली करण्यात येणार नाही.

४. या पदोन्नतीमुळे जबाबदारी आणि कर्तव्य यात वाढ होत नसलीतरी नियमित पदोन्नती प्रमाणे वेतननिश्चितीमध्ये लाभ देण्यात येईल मात्र वेतननिश्चिती मिळालेला लाभ त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक पदोन्नती मिळाल्यास पुन्हा देय होणार नाही.

५. जर कर्मचा-यास विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखालील पदोन्नतीनंतर कर्मचा-यास वेतनश्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

६. या योजनेअंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळाली असली तरी त्याचे नाव कनिष्ठ/मुळ संवर्गाच्या जेष्ठता सूचीमध्ये राहील.

सदर आदेशाची संबधित कर्मचाऱ्यांचे मुळ सेवा पुस्तकात नोंद घेणेत यावी व सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यात यावी. सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.202602031400005..असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 03-02-2026 21:31:14

(आनंद भंडारी, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर

प्रती, कै.श्री.रहाणे बाजीराव गंगाधर,हातपंप मदतनीस.पंचायत समिती संगमनेर
द्वारा- गटविकास अधिकारी,पंचायत समिती संगमनेर

प्रत - १. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना माहितीसाठी.
२. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
३. कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग अहिल्यानगर
४. निवड नस्ती

(आनंद भंडारी, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर